www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १२८ • Title - Code :- MAHMAR49513 • मंगळवार दि.६ फेब्रुवारी २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.


## मी उमेदवार देईल त्याला मतदान करा-उपमुख्यमंत्री अजित पवार

### इतके वर्ष वरिष्ठांचे ऐकले आता माझे ऐका

**मुंबई–मी लवकरच महायुतीचा उमेदवार जाहीर करणार असून मलाच उमेदवार समजून मतदान करा, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामतीकरांना केले आहे. शेवटची निवडणूक आहे, असे सांगून तुम्हाला भावनिकही केलं जाईल. मात्र कधी शेवटची निवडणूक होईल काय माहिती? असा सवाल उपस्थित करत अजितदादांनी शरद पवारांवर निशाणा साधला आहे. तुम्ही इतकी वर्षे वरिष्ठांचे ऐकले आता माझं ऐका. उद्या जर तुम्ही आपल्या विचारांचा खासदार दिला तर मी मोदींना सांगू शकतो. बारामतीकरांनी आपल्या विचारांचा खासदार दिला आहे, आता माझी कामे झाली पाहिजे, असेही अजित पवार यावेळी बोलतांना म्हणाले. अजितदादा पुढे बोलतांना म्हणाले की, मी आजपर्यंत तुम्हाला काहीही मागितलेले नाही, मी फक्त तुम्हाला मत मागतो. मी खासदारकीला जो उमेदवार देणार आहे, त्याच्यासाठी मते मागणार असल्याचे भावनिक आवाहन बारामतीत केले.**



अजित पवार म्हणाले, काहींना उपाध्यक्ष, अध्यक्ष बनवलं त्यांचं काम जोरात सुरू आहे. शरद पवार गटाकडे परत गेलेले मला मुंबईत भेटले. त्यावेळी त्यांनी मला माझी चूक झाल्याचे सांगितले. परंतु मी अनेक निर्णय हे धाडसाने घेतलेले आहेत. आता निवडणुका जवळ आल्या आहेत. आधी लोकसभा आणि नंतर विधानसभा निवडणूक असणार आहे. जर तुम्ही मला कौल दिला, तर पुढील कामाला मी बांधील असेल.स्वच्छता ठेवा, पचापच थुकू नका, फुले तोडू नका, कॅनॉलमध्ये घाण टाकू नका. मला बारामतीला देशात पहिल्या क्रमांकाचे बक्षिस मिळवायचं आहे. आपल्या शब्दाला किंमत आली असून एका व्यावसायिकाने काम करायला एक कोटी दिले. बारामतीतील काम करायला पक्षाचे पैसे घातले. एकीकडे अजित सांगतो आहे आणि एकीकडे वरिष्ठ सांगतो आहे कुणाचे ऐकायचे. इतकी वर्षे वरिष्ठांचे ऐकले आता माझं ऐका.अजूनही काही जण कार्यकर्त्यांची जाणीवपूर्वक नावे घेत नाहीत, पण तुमच्या गटा तटामुळे मला त्रास होतो. गट तट मला मान्य नाही. मी एकटा फिरेन, लोकं द्यायचे तेवढे मते देतील, असे म्हणत त्यांनी भाषणाच्या सुरुवातीला कानउघडणी केली. कामे करताना मला वाईटपणा घ्यावा लागतो. अशा शब्दात अजित पवारांची कार्यकर्त्यांची कान उघडणी केली.

## वणी व आर्णी मतदारसंघातील निवडणूक तयारीचा जिल्हाधिका-यांकडून आढावा

### मतदान केंद्र व स्ट्राँग रुमची पाहणी;आदर्श आचारसंहितेचे पालन करण्याच्या सुचना

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणूक- २०२४ च्या पार्श्वभुमीवर चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी चंद्रपूर लोकसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या वणी व आर्णी (जि. यवतमाळ) येथील निवडणूक तयारीचा आढावा घेतला तसेच मतदारसंघातील मतदान केंद्र व स्ट्राँग रुमची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत यवतमाळचे जिल्हाधिकारी पंकज अर्शिया उपस्थित होते.

उपविभागीय कार्यालय वणी येथे वरील दोन्ही विधानसभा मतदारसंघाची आढावा बैठक पार पडली. बैठकीला सहाय्यक जिल्हाधिकारी याशिनी नागराजन तसेच उपविभागीय अधिकारी नितीन हिंगोले यांच्यासह मतदार संघातील उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, नायब तहसिलदार व नोडल अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.सदर आढावा सभेत लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने पूर्वतयारीचा आढावा घेण्यात आला. यात मतदारसंघात राबविण्यात येणाऱ्या स्वीप ॲक्टिव्हिटी अंतर्गत मतदान जनजागृती व मतदार नोंदणी, नव मतदारांची नोंदणी, मयत व स्थलांतरित नावे कमी करणे, यादी शुद्धीकरण, महिलांचा सहभाग तसेच मतदानाची टक्केवारी वाढवणे यावर चर्चा करण्यात आली. वंचित घटक जसे तृतीयपंथी, देहविक्री करणा–या स्त्रिया, भटक्या जाती जमातीतील व्यक्ती, आदिवासी यांचे



समावेशन करण्यासाठी केलेल्या उपाययोजना यावरसुध्दा चर्चा करण्यात आली.यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी मतदान केंद्रातील पायाभूत सुविधा, संवेदनशील मतदान केंद्रे, मागील निवडणुकांमधील निवडणूक संदर्भातील दाखल झालेले गुन्हे व झालेली कारवाई तसेच निवडणुकीच्या अनुषंगाने करावयाची प्रतिबंधात्मक कारवाई याबाबत संबंधित अधिका–यांना सुचना दिल्या. तसेच भारत निवडणूक आयोगाकडून प्राप्त होणाऱ्या विविध सूचना यांची अंमलबजावणी करणे आणि आदर्श आचारसंहितेचे पालन करणे याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. एकाच इमारतीमध्ये पाच पेक्षा जास्त मतदान केंद्र असलेल्या इमारती तसेच स्ट्राँग रुम आणि डिस्पॅच हॉलला त्यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली व त्यासंबंधी करावयाच्या उपाययोजना याविषयी निर्देश दिले.

### सिने अभिनेत्री तेजश्री प्रधान घुग्घुस शहरात येणार

## मा.ना.सुधीरभाऊ मुनगंटीवार क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन

**घुग्घुस । प्रतिनिधी**

घुग्घुस येथील प्रयास सखी मंचतर्फे मा. ना.सुधीरभाऊ मुनगंटीवार क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवांतर्गत मकर संक्रांती उत्सव व सांस्कृतिक कार्यक्रम तथा महिला संमेलनाचे आयोजन गुरुवार, ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता प्रयास सभागृह केमिकल नगर येथे करण्यात आले आहे.

कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी विशेष अतिथी म्हणून सिने अभिनेत्री तेजश्री प्रधान घुग्घुस शहरात पहिल्यांदाच येणार आहे.उद्घाटक मंत्री वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्य व्यवसाय महाराष्ट्र राज्य तथा चंद्रपूरचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार, विशेष अतिथी सिने अभिनेत्री तेजश्री प्रधान, प्रमुख अतिथी राजुरा विधानसभा निवडणुक प्रमुख तथा चंद्रपूरचे माजी जि.प.अध्यक्ष देवराव



भोंगळे, भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, माजी पं.स.उपसभापती निरीक्षण तांड्रा, माजी सरपंच संतोष नुने, राजकुमार गोडसेलवार, माजी ग्रा. पं. सदस्य संजय तिवारी, सिनू इसारप, साजन गोहने, प्रकाश बोबडे, मल्लेश बल्ला, विनोद चौधरी, पुनम शंकर, हसन शेख, रत्नेश सिंग, महेंद्र साठे, महेश लठ्ठा, संजय भोंगळे उपस्थित राहणार आहे.बुधवार, ७ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ ते ५ वाजेपर्यंत प्रथम दिवस क्रीडा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, लिंबू चम्मच स्पर्धा, बोरा रेस स्पर्धा, रस्सी खेच स्पर्धा, संगीत खुर्ची स्पर्धा घेण्यात येणार आहे.गुरुवार, ८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता द्वितीय दिवस सांस्कृतिक स्पर्धा, एकल नृत्य, समुह नृत्य, फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात येणार आहे तसेच हळदीकुंकू व वाण वाटप करण्यात येणार आहे.कार्यक्रमाला मोठया संख्येत महिलांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक प्रयास सखी मंच तर्फे करण्यात आले आहे.

## सेंट जॉनमध्ये फेअरवेल पार्टी उत्साहात साजरी

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिक यशबोध ज्ञान प्रबोधिनी द्वारा संचालित सेंट जॉन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथे दि. ३ फेब्रुवारी रोजी इयत्ता बारावीच्या विदयार्थीसाठी फेअरवेल पार्टीचे आयोजन करण्यात आले.

कॉलेजमधील फेअरवेल पार्टी हा जीवनातील एका नव्या क्षेत्रात पाऊल ठेवताना त्यांना निरोप देण्यासाठी साजरा केला जातो.निरोपाचा क्षण व शाळेने आजवर दिलेली शिकवण, केलेले संस्कार व जगाला निधळ्या छातीने समोर जाण्याची सकारात्मक इच्छाशक्ती ही सर्व शिदोरी घेऊन हळव्या अंतकरणाने व जड पाऊलांनी शाळेची वेस ओलांडण्याचा, जीवनातील अवस्मरणीय क्षण म्हणजे निरोप समारंभ. समारंभाला शाळेचे प्रबंधसंचालक चंद्रशेखर इंगळे, प्राचार्य संतोष यादव, उपप्राचार्य महेंद्र भोयर हे प्रामुख्याने उपस्थित होते.प्रसंगी विदयार्थ्यांनी भविष्यातील अडचणी तसेच शैक्षणिक, सामाजिक- आणि मानसिक स्थैर्य कसे टिकवावे यासंबंधी अनेक प्रश्न शिक्षकांसमोर मांडले, शिक्षकांनीसुद्धा आपले मुद्देसुद उत्तरे देऊन विदयार्थीचे समाधान केले. पार्टी



म्हटले तर मनोरंजन हे आलेच, विदयार्थानी नृत्य आणि काहीं मनोरंजक कृती करुन कार्यक्रमाला रंजक बनवले.तसेच आपले शाळेविषयी आणि शिक्षकांविषयी मनोगत व्यक्त केले.शाळेचे प्रबंध संचालक चंद्रशेखर इंगळे यांनी आपल्या संदेशात सांगितले की कुठलेही कार्य हे सकारात्मक विचार करून केले तर ते यशस्वीच होते. आणि नकात्मकतेने केले तर त्याचे परिणामही नकारात्मकच होते.प्राचार्य श्री संतोषजी यादव यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मुलांना असा संदेश दिला की यश आणि अपयश ह्या नान्याच्या दोन बाजू याहेत.अपयश आले तर खचू नका, कोलमडू नका, नव्याने पून्हा प्रयत्न करा. यश नक्कीच तुमच्या पायांशी लोळण घेत येईल. तसेच कष्ट करा, कष्टाविना पर्याय नाही, आपले व आपल्या परिवाराचे नाव उज्वल करा असे प्रतिपादन केले.शेवटी जड अंतकरणाने व दाटलेल्या कंठाने मूलांनी शाळेचा निरोप घेतला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व शिक्षिका वैष्णवी बोधाले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी भरपूर सहकार्य केले.

## शेतकऱ्यांनी जवस उत्पादक ते उद्योजक व्हावे : कुलगुरू डॉ.शरद गडाख

**चिमूर । प्रतिनिधी**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला अंतर्गत येणाऱ्या अखिल भारतीय समन्वयीत जवस संशोधन प्रकल्प कृषी महाविद्यालय नागपूर यांच्या वतीने जवस शेती दिनाचा कार्यक्रम चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यातील कृषी मंडळ कार्यालय शंकरपूर यांचे अंतर्गत येत असलेल्या किटाडी या गावी रविवारी दिनांक ४ फेब्रुवारीला नामदेव नागोसे यांच्या शेतात घेण्यात आला.

डॉक्टर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला चे कुलगुरू डॉ. शरद गडाख, यांनी एक गाव एक वाण या संकल्पनेतून जवस पिक प्रात्यक्षिक द्यावे असे सुचविले होते. त्या अनुषगाने अखिल भारतीय समन्वयीत जवस संशोधन प्रकल्प, नागपूर व कृषी विभाग शंकरपूर मंडळ यांचा सहाय्याने डोमा, किटाडी, डोंगरगाव, हिरपूर व शंकरपूर येथे २०५ एकरावर प्रात्यक्षिक देण्यात आले. शंकरपूर मंडळात जवस पिकाची साधारणत: २४० हेक्टर लागवड करण्यात आली आहे. अध्यक्षीय भाषणात कुलगुरूनी शेतकर्यांना जवस पिकाची जास्तीत जास्त लागवड करावी तसेच जवस पिकापासून तेल आणि मूल्यवर्धित पदार्थ तयार करून उत्पादक ते उद्योजक होऊन उत्पन्नामध्ये वाढ करावी असे आव्हान केले. डॉ.धनराज उंदीरवाडे यांनी मनोगत व्यक्त करताना शेतकऱ्यांनी भात पिक काढणीनंतर जमिनीत उपलब्ध असलेल्या



ओलाव्याचा वापर करण्यासाठी रब्बी हंगामात जवस संशोधित वाण पी के वी एन एल २६० वाणाची लागवड करून अधिक नफा मिळवावा असे सुचविले. शंकर तोटावर, जिल्हा कृषी अधीक्षक, चंद्रपूर यांनी चंद्रपूर जिल्हातील पारंपारिक पिक असलेल्या जवस पिकाची लागवड करावी व जवस तेलाचा दैनंदिन आहारात वापर करून आरोग्य सुदृढ ठेवावे असे मनोगत व्यक्त केले. जवस पिकाचे प्रात्यक्षिक लागवड केलेल्या किटाडी येथील शेतकरी नामदेव नागोसे यांचा विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू डॉ. गडाख यांनी शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. महिला शेतकरी तसेच उद्योजक सुनीता गायकवाड यांचा सत्कार गडाख यांच्या हस्ते शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला. भास्कर फरकाडे कृषी पर्यवेक्षक शंकरपूर मंडळ तसेच कृषी सहाय्यक प्रताप रेंगे, प्रमोद भगत यांनी प्रात्यक्षिक घेण्यासाठी मदत केल्याबदल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. गडाख आणि विस्तार शिक्षण संचालक डॉ. उंदीरवाडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात डॉ. बिना नायर, जवस पैदासकार यांनी जवस पिक क्षेत्रामध्ये पुनर्जीवन करण्यात आल्या बद्दल व जवसाचे आरोग्यातील महत्व सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्वप्नील ठाकरे, जवस कृषिविद्यावेता यांनी केले. डॉ. गोपला, वनस्पती रोग तज्ञ यांनी आभार प्रदर्शन केले. जवस शेती दिनाचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. संदीप कामडी, मोहरी पैदासकार, जगदीश पर्बत, नंदकिशोर टेकाळे आणि रोहित कोसे, अखिल भारतीय समन्वयीत जवस संशोधन प्रकल्प, नागपूर तसेच श्री. एन. ए. माटे, मंडळ कृषी अधिकारी, शंकरपूर आणि सहकारी मंडळीनी मदत केली. सदर कार्यक्रमास डोमा, किटाडी (म.), डोंगरगाव, हिरपूर व शंकरपूर येथिल ४०० शेतकऱ्यानी सहभाग घेतला.

## छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य लोकशाहीला बळ देणारे-आ.किशोर जोरगेवार

### जाणता राजा महानाट्य, आ.किशोर जोरगेवार यांनी केली महाराजांची आरती





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शिवरायांच्या पूर्वी अनेक राजे होऊन गेले शिवरायां नंतरही अनेक राजे उदयास आले. पण सर्वात लोकप्रीय व आदर्श राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना ओळखले जाते. त्यांचे स्वराज्य बद्दल असणारे प्रेम, निष्ठा, पराक्रम व निष्कलंक चारित्र्य, शेतकर्यांच्या भाजीच्या देठालाही हात लागता कामा नये. असा आदेश सेनेला देत शेतकऱ्यांचा हिताचा विचार करणारे महाराज हे प्रजादक्ष राजे होते. त्यांचे कार्य लोकशाहीला बळ देणारे असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

चंद्रपूर जिल्ह्यात सांस्कृतिक कार्य विभाग, महासंस्कृती व चंद्रपूर जिल्हा प्रशासनातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित महानाट्य जाणता राजा महानाट्य चे प्रयोग दिनांक ०२ ते ०५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान चांदा क्लब ग्राउंड, येथे आयोजित करण्यात आले आहे. दरम्यान सदर महानाट्याच्या दुस–या दिवशी आमदार किशोर जोरगेवार यांची प्रमूख उपस्थिती होती. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मनपा आयुक्त विपिन पालिवाल, तहसिलदार विजय पवार, उपायुक्त खवले, माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल, माजी नगर सेवक बलराम डोडाणी, सूर्यकांत खनके, यांच्यासह इतर मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, शिव छत्रपती महाराज आमचे आराध्य आहे. त्यांच्या जिवणकार्यावर आधारीत नाट्य प्रयोगाचा नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित राहत लाभ घेत आहे. मात्र प्रशासनाने येणा–या नागरिकांना परत पाठवू नये. त्यांना नाट्य प्रयोग पाहात येईल यासाठी त्यांची व्यवस्था करावी असे ते यावेळी म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात हुकुमशाही नव्हती. ते रयतेचे राज्य होते. पून्हा आपल्याला शिव छत्रपती महाराज यांच्या विचारांचे अनुसरण करुन रयतेचे राज्य स्थापन करण्याची गरज आहे. जगातील पहिल्या लोकशाहीचा प्रयोग कदाचित शिवाजी महाराज यांच्या कार्य काळात झाला असावा असे ते यावेळी म्हणाले.आज चंद्रपूरात सलग चार दिवस सदर नाट्य प्रयोग सादर केल्या जाणार आहे. या नाट्य प्रयोगाच्या माध्यमातून आपल्याला छत्रपती शिवाजी महाराज यांची लोकहिताची कार्यप्रणाली अनुभवता येणार आहे. त्याकाळी स्वराज्य निर्मितींसाठी त्यांनी केलेल्या संघर्षाचा इतिहास दर्शविणारे हे नाट्य आहे. एका नव्या उर्जेचा संसार यातून होणार असल्याचे यावेळी ते म्हणाले. या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार व माता महाकाली महोत्सव समीतीच्या वतीने सदर महानाट्यातील कलाकारांचा माता महाकालीची मुर्ती देत सन्मान करण्यात आला. सदर नाट्य प्रयोग पहाण्यासाठी हजारो नागरिकांची उपस्थिती होती.

# आज निवडणूक सूत्रः पैसा पेरा, राज करा!

**पहिल्या निवडणुकीबाबत या गोष्टी खास होत्या– १) सन १९५१–५२ साली प्रत्येक मतदान केंद्रांसाठी स्वतंत्र बॅलेट पेपर बॉक्सची सुविधा उपलब्ध होती. २) मतदाराला कोणत्याही मतदान केंद्रावर आपलं मत बॉक्समध्ये टाकण्याचं स्वातंत्र्य होतं. ३) कोणत्याही उमेदवाराला मतं देण्याचं स्वातंत्र्य पहिल्या निवडणुकीत देण्यात आलं होतं. यासंबंधीची ज्ञानवर्धक माहिती देत आहेत श्री.एन. के.कुमार जी. ती वाचा व प्रगल्भ व्हा.. संपादक.**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लोकशाही पद्धतीने सरकार स्थापन करण्यासाठी सन १९५१–५२ साली भारतात पहिल्यांदा निवडणूक घेण्यात आली. या प्रथम निवडणुकीस फेब्रुवारी महिन्यात सुरूवात झाली आणि ती तब्बल ४ महिन्यानी संपली होती. तेव्हा भारतात आतासारखे सोशल मीडिया, टीव्ही किंवा जाहिरातींचा सुळसुळाटही नव्हता. त्याकाळात ईव्हीएमसारखं तंत्रज्ञानही नव्हतं. त्यामुळं प्रचारसभा, वृत्तपत्र, फलक, पत्रक वाटून आणि प्रत्येकाच्या घरी जाऊन प्रचार होत असे. स्वतंत्र भारतात त्या साली पहिली लोकसभा निवडणूक झाली. त्या निवडणुकीत एकूण देशातील ५४ राजकीय पक्ष सहभागी झाले होते. देशभरात १,८७४ उमेदवार निवडणुकीसाठी उभे होते.

भारतीय संविधानाच्या भाग १५मध्ये अनुच्छेद ३२४ ते अनुच्छेद ३२९पर्यंत निर्वाचनाची व्याख्या केली आहे. त्यांत निर्वाचनांचे अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण हे निर्वाचन आयोगमध्ये निहित आहे, असे सांगितले आहे. तसेच निर्वाचन आयोगाला निवडणूक संपन्न करण्याची जबाबदारी दिली आहे. सन १९८९पर्यंत निर्वाचन आयोग केवळ एक सदस्यीय संगठन होते. परंतु दि.१६ अक्टोबर १९८९ रोजी राष्ट्रपती अधिसूचनेद्वारे आणखी दोन निर्वाचन आयुक्तांची नियुक्ती केली गेली. सार्वजनिक पद धारण करण्यासाठी एक स्वतंत्र नेता निवडला जातो. ही एक औपचारिक निर्णय प्रक्रिया आहे. निवडणूक कधी कधी कार्यकारी अधिकारी, न्यायपालिका, प्रादेशिक आणि स्थानिक सरकारी यांसाठी घेतली जाते. विधिमंडळातील कार्यालये सदस्यांनी भरू शकतात. ही प्रक्रिया स्वयंसेवी संघटना, कंपन्या, क्लब, इतर अनेक खाजगी व व्यावसायिक संस्थामध्ये वापरली जाते. निवडणूक किंवा निर्वाचन–इलेक्शन ही लोकशाहीची एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे, ज्या द्वारे जनता आपल्या प्रतिनिधींना निवडते. निवडणूकांद्वारे आधुनिक लोकतंत्रचे लोक आमदार आणि कधी कधी न्यायपालिका आणि कार्यपालिका या विभिन्न पदांवर निवडून येण्यासाठी व्यक्तिंना निवडतात. यांद्वारे क्षेत्रीय आणि स्थानीय जागांसाठीही व्यक्तिंची निवड होते. वस्तुतः निवडणूकांचा प्रयोग व्यापक स्तरावर होत आहे आणि हे खाजगी संस्था, क्लब, विश्वविद्यालय, धार्मिक संस्था, इत्यादीमध्ये पण प्रयुक्त होत आहे. भारतीय लोकतंत्रात्मक निवडणूक प्रक्रियेचे वेगवेगळे स्तर आहेत. परंतु मुख्यत: संविधानात पूर्ण देशासाठी एक लोकसभा आणि वेगवेगळ्या राज्यांकरिता वेगळ्या विधानसभांचे प्रावधान आहे.

लोकसभेच्या एकूण ५४३ सीटांपैकी विभिन्न राज्यातील वेगवेगळ्या संख्येमध्ये प्रतिनिधी निवडले जातात. तसेच वेगवेगळ्या राज्यांच्या विधानसभांसाठीही वेगवेगळ्या संख्येमध्ये आमदार निवडले जातात. नगरीय निकाय निवडणुकांचे प्रबंध राज्य निर्वाचन आयोग करते. तर लोकसभा व विधानसभा निवडणुका भारत निर्वाचन आयोगाच्या नियंत्रणात होतात. ज्यात वयस्क मताधिकार प्राप्त मतदाता प्रत्यक्ष मतदानाद्वारे सांसद आणि आमदार निवडतात. लोकसभा आणि विधानसभा या दोन्हींचा कार्यकाल पाच वर्ष असतो. निवडणूकांसाठी सर्वात पहिले निर्वाचन आयोग अधिसूचना जारी करते. अधिसूचना जारी झाल्यावर संपूर्ण निर्वाचन प्रक्रियेचे तीन भाग– नामांकन, निर्वाचन आणि मतगणना असे होतात. निर्वाचनाची अधिसूचना जारी होताच नामांकन पत्र दाखल करण्यासाठी सात दिवसांचा वेळ मिळतो. त्यानंतर एक दिवसाचा कालावधी हा त्यांच्या छाननीसाठी ठेवला जातो. यात अन्य अनेक कारणांनी नामांकन पत्र रद्द पण करतात. तत्पश्चात दोन दिवस नाव परत घेण्यासाठी दिले जातात. ज्याना निवडणूक लढवायची इच्छा नाही ते आवश्यक विचार विनिमयानंतर आपले नामांकन पत्र परत घेऊ शकतात. सन १९९३च्या विधानसभा आणि सन १९९६च्या लोकसभा निवडणुकांमध्ये विशिष्ट कारणांमुळे चार–चार दिवसांची मुदत दिली गेली. तथापि सामान्यत: हे कार्य दोन दिवसात संपन्न करण्याचा प्रयत्न केला जातो. कधीकधी एखाद्या क्षेत्रात पुन्हा मतदानाची स्थिती निर्माण झाली. तर त्यासाठी वेगळा दिवस ठरवला जातो. मतदानासाठी निश्चित करण्यात आलेल्या मतदान केंद्रांवर मतदानाची वेळ सामान्यत सकाळी ७ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत ठेवली जाते.

इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन आल्यावर मतगणनेसाठी सामान्यत: एक दिवसाचा कालावधी ठेवला जातो. मतगणना सातत्याने चालू असते त्यासाठी विशिष्ट मतगणना केंद्र निश्चित करण्यात येते. या मतदान केंद्रांवर अनाधिकृत व्यक्तिंचा प्रवेश वर्जित असतो. सगळे प्रत्याशी, त्यांचे प्रतिनिधि आणि पत्रकार इत्यादींसाठी निर्वाचन अधिकाऱ्यांद्वारे प्रवेश पत्र दिले जातात. वर्तमान काळात निर्वाचन क्षेत्रानुसार




मतगणना केली जाते आणि त्यासाठी तेथील सर्व मतदान केंद्रांवर मतांची गणना करून परिणाम घोषित केला जातो. परिणामानुसार ज्या पक्षाला बहुमत प्राप्त झाले, तो पक्ष केंद्रात किंवा राज्यात आपले सरकार स्थापन करतो. भारतात मतदान करणे हे कायद्यानुसार अनिवार्य नाही. हा नागरिकांचा अधिकार आहे, कर्तव्य नव्हे.

राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि राज्यसभा सदस्य यांच्या निवडणूका प्रत्यक्ष न होता अप्रत्यक्ष स्वरूपात होतात. त्यांना जनतेने निवडून दिलेले जनप्रतिनिधीच निवडतात. निवडणूकांदरम्यान संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा निवडणूक आयोगाच्या नियंत्रणात कार्य करते. निवडणूकांची घोषणा झाल्यावर आचारसंहिता लागू होते आणि तिचे प्रत्येक राजकीय पक्ष, त्यांचे कार्यकर्ते आणि उमेदवार यांना पालन करावे लागते. आधुनिक प्रतिनिधी हे लोकशाही पद्धतीने निवडण्यासाठी एक साधन म्हणून निवडणुकीचा सार्वत्रिक वापर होतो. ईश्वर चिठ्ठीद्वारे सदस्यांची निवड करणे, हे तितकेसे विश्वसनीय वाटत नव्हते. म्हणून लोकशाहीच्या सार्वत्रिक निवडणुका या गुप्त मतदान पद्धतीने घेण्याचा निर्णय झाला. त्या काळात ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट अर्थातच नव्हते. सन १९५१–५२मध्ये बॅलेट पेपर– मतपत्रिकेचा वापर करण्यात आला होता. मतपत्रिका ही मतपेटीत टाकण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रांवर वेगवेगळ्या मतपेट्या ठेवण्यात आल्या होत्या. कोणत्याही मतपेटीत आपलं मत टाकण्याचं स्वातंत्र्य मतदाराला देण्यात आलं होतं.

सांप्रतकाळी उमेदवार हा गर्भश्रीमंत असावा लागतो. कारण त्याला निवडणुकीस सारे घरदार विकावे लागते. का? तर प्रत्येक मत त्याला विकत घ्यावा लागतो. एकेका मताला तीनशे ते पाचशे रुपये मोजावे लागतात. जनता सुशिक्षित झाली, मात्र मतदार अधिक हावरा व आमिषाला बळी पडणारा झाला आहे. त्याला विकास करणारा नेता नको तर देश उजाडणारा हवा आहे. गुप्त मतदान पद्धती ही नावालाच राहिली आहे. आज आपले मत स्वमत न राहिल्यामुळे ते मत दान न होता मत क्रय–विक्रय सर्रास होताना दिसत आहे. दांडगाई करणाऱ्या उमेदवाराचे खुपच फावत आहे. याला आळा सुशिक्षित– सुजाण नागरिक नाही तर आणखी कोण घालणार? म्हणून आजच्या मतदारास लोकशाही नको तर हुकूमशाही अर्थात पारतंत्र्यच हवे आहे. पैसाआडका, लुगडे, धोतर, कापडचोपड, दारु व पार्टी घेतलेले मतदार विश्वासघात करत नाहीत, असा उमेदवारांचा ठाम विश्वास असतो. म्हणून ते खुप उधळपट्टी करतात. मात्र फुकटात विकासपुरुषास निवडून आणण्यासाठी मतदाराचे वाकडे पाऊल पडत नाही. काही सुजाण मतदार मात्र पैसे पेरणाऱ्यांकडून खुशाल फायदा उठवितात आणि जनकल्याण करणार्या निष्ठावान उमेदवारास आपले अमूल्य मत दान करून मतदानाचा हक्क बजावतात. पैसे पेरून देशाला खाईत लोटणाऱ्या देशद्रोही– बेगडी नेताजीस अशीच धूळ चारली पाहिजे, तरच आजचा सुशिक्षित तरुण भारताचा सुजाण नागरिक म्हणता येऊ शकेल. सन २०१९मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा बॅलेट पेपरचा वापर करण्यात यावा, अशी मागणी विरोधक व मतदारांकडून केली गेली. ईव्हीएममध्ये घोळ असल्याची विरोधकांकडून होणारी टीका आणि ईव्हीएमचा होणारा घोळ यामुळे पुन्हा एकदा यंदाही व्हीव्हीपॅट आणि बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची मागणी विरोधकांसह जागृत मतदार करत आहेत. मात्र पाषाण हृदयी निवडणूक आयोग ती मागणी धुडकावूनच लावत आहे, हे विशेष!

आज तंत्रज्ञानाच्या युगात सर्वकाही ऑनलाइन केले जात आहे. जसे की ऑनलाइन शॉपिंग, ऑनलाइन मार्केटिंग, ऑनलाइन मागणी, ऑनलाइन देवदर्शन, ऑनलाइन शिक्षण, ऑनलाइन अर्ज, ऑनलाइन परीक्षा आदींप्रमाणे ऑनलाइन मतदान सुद्धा होणे काळाची गरज आहे. त्यामुळे सर्वच निवडणूक घोटाळ्यांना टाळे लागेल, असाही एक मतप्रवाह दिसून येत आहे, तेही योग्यच म्हणा!

**श्री.एन. के.कुमार जी. (से.नि.प्राथ.शिक्षक)**
**(भारताच्या वैभवशाली इतिहासाचे गाढे अभ्यासक व विश्लेषक.)**
**मु. पो. ता जि. गडचिरोली, पिन–४४२६०५.**
**फक्त व्हॉट्सप. ९४२३७१४८८३.**

# मुंबईकरांची लूट, काम पूर्ण नसतांनाही कोस्टल रोडचे उद्घाटन

## निवडणुकीच्या तोंडावर श्रेय घेण्याचा प्रकार–आदित्य ठाकरे

**मुंबई–**राज्यात अनेक प्रकल्प पूर्ण झालेले असतांनाही त्यांचं उद्घाटन केलं जात नाही आहे. कोस्टल रोडचं काम अपूर्ण आहे. कोस्टल रोड बनवण्याचं उद्धव ठाकरेंचं स्वप्न होतं.मात्र निवडणुकीच्या तोंडावर या प्रकल्पाचं उद्घाटन केलं जाणार आहे. ज्यांचा या मुंबईशी कुठलाही संबंध नाही. ते फक्त मुंबई लुटण्याचं काम करत आहेत. ते या प्रकल्पाचं निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्रेय घेत असल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी भाजपवर केला आहे.कोस्टल रोडच्या पहिल्या १० किमीचे लोकार्पण पीएम मोदींकडून होत आहे. आयुक्त इक्बाल सिंह चहल यांना सीएस बनायचे आहे किंवा दिल्लीत जायचं आहे. त्यामुळे ते खोटी माहिती देत आहेत असल्याचे आदित्य ठाकरे म्हणाले. यांनी मुंबई लुटली तसे पुढे ही लोक देश, राज्य लुटतील. अंडर ग्राऊंड कार पार्किंग होऊ देणार नाही. मुंबईकरांच्या पैशातून तबेले बांधू देणार नाही. मुंबईच्या जनतेच्या पैसा मी वाया जावू देणार नसल्याचा इशाराही आदित्य यांनी यावेळी दिला.आदित्य ठाकरे म्हणाले की, एमएमआर रिझनमध्ये अनेक गमती होत आहेत. कोस्टल रोड प्रकल्प उद्धव साहेबांचा ड्रीम



प्रोजेक्ट आहे. या प्रकल्पासाठी आम्ही अनेक भेटी दिल्या. बोगद्याची सुद्धा पाहणी केली आहे. मात्र, ज्यांचा मुंबईशी काहीही सबंध नाही ते उद्घाटन करणार आहेत. डिसेंबर महिन्यात कोस्टल रोडचे काम पूर्ण व्हायला हवे होते. एमटीएचएलचे तीन महिने उद्घाटन झाले नव्हते. कोस्टल रोड पूर्ण नसतानाही उद्घाटन केले जात असल्याचा आरोपही आदित्य यांनी केला.आदित्य म्हणाले– भाजपने रेसकोर्सबाबत समर्थन आहे की विरोध याबाबत भाजपने त्यांची भूमिका स्पष्ट करावी. मुंबईच्या रेसकोर्सवर हजारो मुंबईकर धावायला, योगा करायला जातात, तसेच अनेक कार्यक्रम होतात. बिल्डर हे घटनाबाह्य मुख्यमंत्र्यांचे मित्र आहेत, बिल्डर आहेत त्यांची बातमी फुटली. क्लब हाऊस बांधणार नाही असं ठरलं आहे. थीम पार्कऐवजी आता सेंट्रल पार्क करू असे सांगत आहेत. कोणत्या कॉंट्रॅक्टरसाठी भूमिगत कार पार्क बनवत आहेत? कोणत्याही खर्चासाठी टेंडर घ्यावे लागते. मात्र सुटबुटातील लोकांच्या घोड्यांसाठी शंभर कोटी वापरले जाणार आहेत असा आरोप आदित्य यांनी केला.मुंबई लुटली तशी यांना आत्ता राज्य लुटायचे आहे. दिल्लीला गेले तर दिल्ली लुटली. आम्ही प्रश्न घेतल्यानंतर आत्ता क्लब हाऊस यांनी कॅन्सल केले. आम्ही बिल्डरांना तिथे कार पार्क करू देणार नाही. घटनाबाह्य सरकार लवकरच कोसळणार आहे, आम्ही मुंबईकरांचा पैसा वाया जाऊ देणार नाही, अशा शब्दात आदित्य ठाकरे यांनी शिंदे सरकारवर हल्लाबोल केला.

# सोयाबीन खरेदीकरीता ६ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ

**चंद्रपूर–**नाफेडतर्फे आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत सन २०२३–२४ या हंगामात सोयाबीन खरेदीस नाफेडच्या वतीने मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार ९ नोव्हेंबर २०२३ पासून सोयाबीन खरेदीकरीता शेतकरी नोंदणी व खरेदीला सुरुवात झाली असून सोयाबीन खरेदीची अंतिम मुदत ६ फेब्रुवारी २०२४ पर्यंत आहे. यामुळे शेतकऱ्यांना हमीभावाने सोयाबीन विक्री करता येणार आहे.

ही आहेत खरेदी केंद्रे :यामध्ये चिमूर तालुक्यातील चंद्रपूर जिल्हा कृषी औद्यो. सह. संस्था मर्या. चंद्रपूर, चंद्रपूर तालुक्यातील कृषी उत्पन्न बाजार समिती चंद्रपूर, वरोरा तालुक्यातील कृषी उत्पन्न



बाजार समिती वरोरा, आणि राजुरा व गडचांदूर येथील कोरपना तालुका सह. खरेदी विक्री संस्था मर्या. कोरपना ही खरेदी केंद्रे आहेत, असे जिल्हा मार्केटिंग अधिकारी तिवाडे यांनी कळविले आहे.

# कांताबाई रामटेके यांचे निधन

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील सावरगाव येथील हल्ली मुक्कामी श्रीमती कांताबाई गुलाब रामटेके उर्फ तपस्विनी कमळजाबाई अळजपूरकर (वय ७०) यांचे वृद्धपकाळाने दि.५ फेब्रुवारी रोज सोमवारला सावरगाव येथील त्यांचे जावई मनबोध उद्धव गेडाम यांच्या घरी निधन झाले.त्या मुळच्या नैनपूर ता.सिंदेवाही येथील रहिवासी आहेत.त्यांच्या पश्चात दोन मुलिं,एक मुलगा,दोन जावई, नातवंडे व बराच मोठा आप्त परिवार आहे.त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी सकाळी १० वाजता सावरगाव येथील महानुभाव पंथीय समाजाच्या स्मशान भूमीत अंत्य संस्कार करण्यात येणार आहे.



# जितेंद्र आव्हाडांच्या ठाण्यातील घरात बॉम्ब असल्याचा फोन:आव्हाडांच्या निवासस्थानी बॉम्ब शोधक पथक

**मुंबई–**राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या ठाण्यातील नाद या बंगल्यात रात्री बॉम्ब असल्याचा एक निनावी फोन आला. या फोनमुळे एकच खळबळ उडाली होती. त्यानंतर बॉम्बशोधक पथकाने तपासणी केल्यानंतर काहीच निष्पन्न झाले नाही. मात्र दोन दिवसांपूर्वी मुंबईमध्ये आव्हाड यांच्या वर हल्ला होण्याची शक्यता असल्याची माहिती वर्तक नगर पोलिसांकडून देण्यात आली आहे.

हा फोन आल्यानंतर बॉम्बशोधक विभागाने तपासणी केली. पण, तपासात काहीही निष्पन्न झाले नाही. दोन दिवसांपूर्वी मुंबईमध्ये आव्हाड यांच्यावर हल्ला होण्याची शक्यता होती, अश्या प्रकारे त्यांनी ट्विट देखील केले होते. या फोनमुळे ठाणे पोलिसांची चांगलीच पळापळ झाली होती.राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड यांचा ठाण्यातील लक्ष्मीनगर भागात नाद बंगला आहे. त्यांच्या या निवासस्थानी बॉम्ब असल्याची माहिती ठाणे पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे, बॉम्ब शोधक पथक, वर्तकनगर पोलीस त्यांच्या निवासस्थानी दाखल झाले. त्यांनी घराची तपासणी केली. परंतु तिथे काहीही बॉम्बसदृश्य वस्तू आढळून आलेली नाही. ही अफवा असल्याची माहिती पोलिसांनी दिली. याप्रकरणाचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.दोन दिवसांपूर्वी जितेंद्र आव्हाड यांनी एक फोटो शेअर केला होता. या फोटोमध्ये दिसत असलेला माणूस आणि त्याच्यासोबत असलेला आणखी एक गृहस्थ व्हिडिओ कॉलवर कुणाशी तरी बोलत होते. मला मारण्यासंदर्भात त्यांच्यात चर्चा सुरू होती. ती एका पत्रकाराने ऐकली अन् माझ्यासोबत असणाऱ्या पोलीस आणि मुलांना सांगून सावध केले.मात्र, तेवढ्यात तो हातून निसटून हॉटेल ट्रायडंटमध्ये १९ व्या मजल्यावर कुठे तरी गेला. ही बाब नंतर माझ्या कानावर घालण्यात आली. माझ्यासोबत असलेल्या मुलांनी त्याचा पाठलागही करण्याचा प्रयत्न केला. पण, तो त्यांच्या हाती लागला नाही, असं जितेंद्र आव्हाड यांनी सांगितले होते.

# गृहमंत्र्यांशी चर्चा करणार;आ.गायकवाडांनी टोकाची भूमिका का घेतली याची माहिती घेणार–अजित पवार

**पुणे–**भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी शिंदे गटाच्या शहराध्यक्षावर गोळीबार केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले आहे. यावर उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, सर्वांना नियम कायदे सारखे आहेत. या प्रकरणाची पूर्ण माहिती घेऊन मी मुख्यमंत्री शिंदे आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलणार आहे असे त्यांनी स्पष्ट केले आहे.



भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी शिंदे गटाचे शहरप्रमुख शरद गायकवाड याच्यावर सहा गोळ्या झाडल्या. त्यावर बोलताना अजित पवार म्हणाले की, सर्वांकडून कायद्याचे पालन होणे अपेक्षित आहेत. कुणीही कायदा हातात घेण्याचे काम करू नये. सर्वांना नियम कायदे सारखे आहेत. या प्रकरणाची पूर्ण माहिती घेऊन मी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीशी बोलणार आहे. तसेच आमदार गणपत गायकवाड यांनी टोकाची भूमिका का घेतली याची माहिती घेणार आहे.उल्हासनगरमध्ये झालेली घटना आपण पाहिली असून वैतागलेल्या माणसासारखा तो बोलत होता. संविधानाने आपल्याला जे अधिकार दिले आहेत त्याचा कुठेही दुरुपयोग होणार नाही याची खबरदारी लोकप्रतिनिधींनी घेतली पाहिजे. मात्र त्यांच्या बोलण्यात फार वेगवेगळ्या गोष्टी समोर आल्या. रात्री उशिरा त्याबाबत आपल्याला माहिती मिळाली वास्तविक कुणीही अशा पद्धतीने कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करू नये. सगळ्यांना नियम आणि कायदे हे सारखेच असतात कुणाच्याबद्दल माझी काही तक्रार असेल तर मी ती पोलीस स्टेशनला देईल संबंधित घटनेबद्दल देखील आपण माहिती घेणार आहोत. याबाबत आपण गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी देखील बोलणार आहे.बाबा सिद्दीकी यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसमधील प्रवेशाबाबत बोलताना अजित पवार म्हणाले की, कुणीही काहीही वक्तव्य करण्याला काहीही महत्त्व नाही. बाबा सिद्दीकी यांच्या बाबतीत अफवा आहे. तसेच छगन भुजबळ राष्ट्रवादी कॉंग्रेस सोडणार असल्याच्या चर्चांवर स्वत: भुजबळ यांनी स्पष्टीकरण दिले आहे. भुजबळ यांनी स्वतः भाजप प्रवेश नकाराला आहे. यामुळे बोलणाऱ्यांनी जबाबदारीने बोलले पाहीजे, असा टोला त्यांनी अंजली दमानिया यांना त्यांचे नाव न घेता लगावला आहे.अजित पवार म्हणाले की, माढा आमदार रणजित राजे निंबाळकर यांच्याबाबत प्रश्नावर अजित पवार संतापले. चांद्यापासून ते बांधापर्यंत सर्व प्रश्नाचे उत्तर द्यायचे का ? कुठे काय चालले आहेत त्याला मी काय उत्तर द्यायचे ? भाजपचा पक्षांतर्गत विषय असून ते त्यांचा प्रश्न ते सोडवतील.

सह्याद्रीचा राखणदार







# ‘जाणता राजा’ महानाट्याला चंद्रपूरकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद


## जिल्हा प्रशासनाचे उत्कृष्ट नियोजन;ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची विशेष सोय

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून ‘जाणता राजा’ या महानाट्याचे प्रयोग राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये आयोजित करण्यात येत आहे. चंद्रपूरमध्येही सांस्कृतिक कार्य विभाग, जिल्हा प्रशासन आणि चंद्रपूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने चांदा क्लब मैदानावर आयोजित या महानाट्याने संपूर्ण जिल्हा ढवळून निघाला.

प्रत्येक जिल्ह्यात ‘जाणता राजा’ या महानाट्याचे तीन दिवस प्रयोग होत आहे. मात्र चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांचा उदंड प्रतिसाद पाहता, चंद्रपूर येथे एक अतिरिक्त दिवस वाढवून जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हावासियांना अनोखी भेट दिली. चार दिवसात हजारो नागरिकांनी ‘याची देही...याची डोळा’ असा छत्रपती शिवाजी महाराजांचा जीवनपट प्रत्यक्षात अनुभवला. जिल्हा प्रशासनाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे या महानाट्याने चंद्रपूरकरांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.





‘जाणता राजा’ महानाट्य निःशुल्क असले तरी गैरसोय होऊ नये यादृष्टीने जिल्हा प्रशासन व चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे पासेस वाटण्याचे नियोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी प्रत्येक तालुक्यातील तहसीलदार व गटविकास अधिकारी यांना याबाबत सुचना केल्या. तसेच मनपा मुख्य कार्यालय व प्रत्येक झोन कार्यालयात पासेस वाटपाचे काऊंटर उघडण्यात आले व तेथे जबाबदार अधिकारी नेमण्यात आले. जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालये यांना कार्यक्रमास उपस्थित राहण्यास ठराविक दिवस देण्यात आला. मनपातर्फे आरोग्य विभागाचे २४ कर्मचारी शिफ्टनुसार पूर्णवेळ कार्यक्रम स्थळी उपस्थित होते. रुग्णवाहिका व अन्य प्रथमोपचाराची सोय येथे ठेवण्यात आली होती. प्रत्येक दिवसाचा प्रयोग संपताच मनपा स्वच्छता कर्मचारी १ तासाच्या आत स्थळ स्वच्छ करीत होते. यात संपूर्ण परिसरात असलेला कचरा उचलुन स्वच्छ करणे, मोबाईल टॉयलेट स्वच्छ करणे, मोबाईल टॉयलेट टँक स्वच्छ राहील याची खात्री करणे, स्टेजवर सुक्ष्म कचरा राहणार नाही याची खात्री करणे इत्यादी कार्ये मनपा स्वच्छता विभागातर्फे ४ दिवस निरंतर करण्यात आली. चंद्रपूर शहरातील चांदा क्लब येथे ‘जाणता राजा’ या महानाट्याचा प्रयोग असला तरी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना छत्रपती शिवरायांचा जीवनपट अनुभवता यावा, यासाठी जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने विशेष सोय केली होती. चंद्रपूर, राजुरा, गोंडपिपरी, मूल, पोंभुर्णा, भद्रावती, बल्लारपूर आणि वरोरा या आठ तालुक्यातील इयत्ता ८ वी, ९ वी आणि ११ वीच्या दररोज २५०० विद्यार्थी याप्रमाणे एकूण ७५०० विद्यार्थ्यांनी प्रयोगाला हजेरी लावली. यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाच्यावतीने विद्यार्थ्यांची ने - आण करण्यासाठी रोज ५३ बसेसची व्यवस्था करण्यात आली होती. तर चंद्रपूर महानगरपालिकेच्या माध्यमातून रोज २५०० विद्यार्थ्यांना नास्ता देण्यात आला. प्रत्येक तालुक्यात २० विद्यार्थ्यांमागे एक नियंत्रक शिक्षक / शिक्षिका यांची नियुक्ती तसेच विद्यार्थी निवड, पालक संमती आणि संपूर्ण व्यवस्थापनासाठी प्रति तालुका ५ नोडल अधिकारी शिक्षण विभागाने नियुक्त केले. याशिवाय विद्यार्थी बसमध्ये बसल्यापासून ते रात्री घरी पोहचेपर्यंत, नियंत्रणासाठी जिल्ह्यात सात सदस्यीय मॉनिटरींग कमिटी स्थापन करण्यात आली होती. रोजी सायंकाळी ४ ते ४.१५ वाजता उपरोक्त तालुक्यातून विद्यार्थ्यांना घेऊन बस निघाल्यानंतर रात्री १०.३० वाजताच्या दरम्यान संबंधित तालुक्यातील मुख्याध्यापक पालकांना शाळेत बोलावून ठेवत होते. जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या उत्कृष्ट नियोजनामुळे तीन दिवसात ७५०० ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ‘जाणता राजा’ या महानाट्याचा प्रयोग अनुभवता आला. याबाबत विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले.  जाणता राजा’ प्रयोगाला चंद्रपूरकरांचा उदंड प्रतिसाद : छत्रपती शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व प्रभावीपणे मांडणाऱ्या ‘जाणता राजा’ या महानाट्याला जिल्ह्याच्या विविध भागातील जनतेने मोठ्या संख्येने हजेरी लावून उदंड प्रतिसाद दिला. प्रेक्षकांची अलोट गर्दी व ‘छत्रपती शिवाजी महाराज की जय’, ‘जय भवानी, जय शिवाजी’चा गजर आसमंतात निनादला. शिवशाहीर महाराष्ट्रभूषण बाबासाहेब पुरंदरे यांच्या दिग्दर्शनात ‘जाणता राजा’ नाट्यकृतीची निर्मिती झाली होती. आतापर्यंत देशात व विदेशात या महानाटचाचे शेकडो प्रयोग झाले आहेत. शिवछत्रपतींच्या पूर्वीचा महाराष्ट्र, महाराष्ट्रामध्ये असलेली तत्कालीन परिस्थिती, त्यानंतर शिवरायांचा झालेला जन्म, तरुण वयात स्वराज्य स्थापनेची घेतलेली शपथ, प्रशासनावरची जरब, अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावर केलेला हल्ला, आग्र्यावरून झालेली सुटका, शिवरायांचा राज्याभिषेक आदी विविध घटनांना उजाळा देणारे प्रसंग यामध्ये जीवंत करण्यात आले आहे. प्रभावी संवाद, भव्य फिरत्या रंगमंचावर २०० पेक्षा अधिक कलाकार व तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रसंगानुरुप उभे करण्यात आलेले देखावे, विविध परंपरा व लोककलांचे सादरीकरण, घोडे, उंट असा लवाजमा, भव्यदिव्य नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत संयोजन व उत्तम संवादफेक प्रेक्षकांना भुरळ पाडणारे होते. रोज चार दिवस तब्बल तीन तास प्रेक्षकांना महानाट्याने खिळवून ठेवले.

# मविआच्या काळात सरकार अजित पवारांनी चालवले-सुनील तटकरे

**रायगड**-महाविकास आघाडीच्या त्या दोन वर्षात सगळे सरकार हे अजितदादांनी चालवले, अशा शब्दात अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना सुनावले आहे. उद्धव ठाकरे यांनी दोन दिवसांच्या रायगड दौऱ्यात खासदार सुनील तटकरे व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टीकेचे लक्ष केले होते या सगळ्याचा समाचार आता सुनील तटकरे यांनी घेतला आहे.



खासदार सुनील तटकरे पुढे बोलताना म्हणाले की, कोरोना काळात पंतप्रधान आले का असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला होता, मात्र देशात वेगवेगळ्या भागात निसर्गाचे अनेक तडाखे बसत असतात सगळयाच ठिकाणी पंतप्रधान पोहोचू शकत नाहीत मात्र आता मलाही ठाकरे यांना प्रश्न विचारावा लागेल तुम्ही मुख्यमंत्री असताना कोरोनाच्या त्या दोन वर्षांमध्ये अजितदादांनी सरकार चालवले त्यामुळे या सगळ्या उद्धव ठाकरे यांच्या भाषणांमधून मनोरंजन होत आहे, असा टोलाही त्यांनीलगावला आहे.सुनील तटकरे म्हणाले की, सहा वेळा लोकसभेवर जाऊन दहा वर्ष केंद्रात मंत्री राहून एखादी योजना अनंत गीतेने सांगावी आणि लाख रुपयाचे बक्षीस मिळवावे. उद्धव ठाकरे यांच्या भाषणात विकासाचा एकही मुद्दा नाही रायगड मधील मेडिकल कॉलेजचे प्रयत्न कोणी केले या सुनील तटकरे यांनी प्रयत्न केले या जिल्ह्यासाठी अनंत गीते यांचे काय योगदान आहे ? असा सवालही तटकरे यांनी उपस्थित केला आहे. तर उद्धव ठाकरे यांनी आपल्यावर घराणेशाहीचा आरोप करावा हे हास्यास्पद आहे. उद्धवजींच्या भाषणामध्ये दोन-तीन दिवस अनेक गमतीजमती ऐकायला मिळाल्याची ही खिल्ली तटकरे यांनी उडवली आहे.सुनील तटकरे म्हणाले की,उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळामध्ये त्यांचे पुत्र सहभागी झाले शिवसेनेमध्ये फूट पडल्याचे ते एक मोठे कारण आहे, असे म्हटले जाते पण मला माहिती नाही अशावेळी माझ्यावर आरोप करण्याचा फार नैतिक अधिकार कोणाला आहे, असे मला वाटत नाही. माझी दोन्ही मुले ही गुणवत्तेवर राजकारणात आहेत, आदिती तटकरे हिला श्रीवर्धनच्या जनतेने ४० हजार मताधिक्याने निवडून दिलं तर अनिकेत तटकरे याला ६५० मते मिळाली आणि तो विधान परिषदेवर गेला. त्यामुळे अशा प्रकारचा घराणेशाहीचा आरोप हा उद्धव ठाकरे यांच्याकडून होणे हे फारच हा हास्यास्पद.

### मराठा आरक्षणाचा अध्यादेश फायनल नाही

# हा अध्यादेश कायदेशीर प्रक्रियेत अडकणार-आंबेडकर


**अकोला**-कुणबी आधीच ओबीसीमध्ये आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही म्हटले की कुणबीसंदर्भात निर्णय आम्ही घेतला आहे. मराठा समाजाचा निर्णय राज्य मागास आयोग घेणार आहे. त्यांचे वक्तव्य महत्वाचे आहे. त्यांनी काढलेला कुणबी मराठ्यांचा विषय पुढे गेलेला नाही, असे वंचित आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. दरम्यान प्रकाश आंबेडकर पुढे बोलताना म्हणाले की, मराठा आरक्षणाचा जीआर अजून फायनल झालेला नाही. या अध्यदेशावर १६ फेब्रुवारीपर्यंत हरकती मागवण्यात आल्या आहेत. त्यानंतरही अध्यादेश फायनल झाला तरी तो कायदेशीर प्रक्रियेत जाणार आहे. कारण ओबीसींचा त्याला मोठा विरोध आहे. या प्रकरणात ओबीसी आणि मराठा हे दोन्ही गट सहजासहजी ऐकणार आहे. यामुळे मुख्यमंत्र्यांचा हा अध्यादेश कायदेशीर प्रक्रियेत



अडकणार आहे.प्रकाश आंबेडकर म्हणाले की, मराठा समाजाने गेल्या ७० वर्षांत स्वता:ची अशी परिस्थिती ओढवून घेतली आहे, ही सत्य परिस्थिती विसरुन चालणार नाही. मराठा समाजात नेहमी दोन गट राहिले आहे. अगदी शिवाजी महाराजांच्या काळापासून हे दोन गट राहिले आहेत. त्या काळात निझामी मराठा मोगलांबरोबर राहिले. आता आरक्षण मागणारे शिवाजी महाराजांसोबत राहिले आहे. त्यांना रयतेचे मराठे म्हणता येईल. मावळ्यांनी मोगलाई मराठ्यांना स्वीकारले आहे. परंतु मोगलाई मराठ्यांनी रयतेच्या मराठ्यांना स्वीकारले नाही. आजही त्यांचे रोटीबेटी व्यवहार सोयीनुसार आहे.प्रकाश आंबेडकर म्हणाले की, छगन भुजबळ यांनी न्हावी समाजाबद्दल वक्तव्य केले. त्यांना मराठ्यांची हजामत करु नये, असे म्हटले. त्यावर बोलतान प्रकाश आंबेडकर म्हणाले, हे समाजाच्या दृष्टीने अंत्यत वाईट आहे. मी त्याची निंदा करतो. ओबीसी नेते म्हणतात प्रकाश आंबेडकर आमच्यासोबत आहे. त्यावर ते म्हणाले, दुर्देव प्रत्येक जण आपल्या आपल्या सोयीने बाबासाहेबांना घेतात. संपूर्ण बाबासाहेब घेत नाही.

# लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न

## वाजपेयींनंतर हा सन्मान मिळवणारे दुसरे भाजप नेते



**नवी दिल्ली**-भारतरत्न जाहीर झाल्यानंतर लालकृष्ण अडवाणी यांनी दिल्लीतील निवासस्थानी हात जोडून अभिवादन केले. त्यांच्यासोबत त्यांची मुलगी प्रतिभा अडवाणीही उपस्थित होत्या.

भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न देण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी सोशल मीडियावर ही माहिती दिली. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्यानंतर ते दुसरे भाजप नेते आहेत, ज्यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान देण्यात येणार आहे.मोदींनी लिहिले की, 'मला कळवताना अतिशय आनंद होत आहे की लालकृष्ण अडवाणी यांना भारतरत्न देण्यात येणार आहे. मी त्यांच्याशी बोललो आणि अभिनंदन केले. ते आपल्या काळातील सर्वात आदरणीय राजकारणी आहेत. देशाच्या विकासात त्यांनी दिलेले योगदान कोणीही विसरू शकत नाही. तळागाळातून कामाला सुरुवात करून त्यांनी देशाच्या उपपंतप्रधानपदापर्यंत मजल मारली. ते देशाचे गृहमंत्री आणि माहिती व प्रसारण मंत्रीही होते. त्यांची संसदीय कार्यशैली नेहमीच अनुकरणीय राहील.'सार्वजनिक जीवनात, अडवाणीजी अनेक दशकांपासून पारदर्शकता आणि अखंडतेसाठी कटिबद्ध राहिले. त्यांनी राजकीय नीतिमत्तेचा आदर्श घालून दिला आहे. राष्ट्रीय एकात्मता आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठी त्यांनी अभूतपूर्व प्रयत्न केले आहेत. त्यांना भारतरत्न देऊन सन्मानित करणे हा माझ्यासाठी खूप भावनिक क्षण आहे. त्यांच्याशी संवाद साधण्याच्या आणि त्यांच्याकडून शिकण्याच्या अगणित संधी मला मिळाल्या हे मी नेहमीच माझे भाग्य समजेन.यापूर्वी २३ जानेवारी रोजी बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पुरी ठाकूर यांना भारतरत्न (मरणोत्तर) देण्याची घोषणा करण्यात आली होती. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २४ जानेवारीला त्यांच्या १०० व्या जयंतीच्या एक दिवस आधी ही घोषणा केली होती. कर्पुरी ठाकूर हे दोनदा बिहारचे मुख्यमंत्री आणि एकदा उपमुख्यमंत्री होते. मागासवर्गीयांच्या हिताचा पुरस्कार करण्यासाठी त्यांची ख्याती होती.अडवाणी यांचा जन्म ८ नोव्हेंबर १९२७ रोजी कराची येथे झाला. २००२ ते २००४ दरम्यान ते अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारमधील ७ वे उपपंतप्रधान होते. याआधी ते १९९८ ते २००४ दरम्यान एनडीए सरकारमध्ये गृहमंत्री होते. ते भाजपच्या संस्थापक सदस्यांपैकी एक आहेत.२०१५ मध्ये, अडवाणी यांना देशाचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मविभूषणने सन्मानित करण्यात आले. त्याच वर्षी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांना भारतरत्न देण्यात आला होता. तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी स्वतः त्यांच्या घरी जाऊन त्यांना हा सन्मान दिला होता.

# शिवसेना (उबाठा) कार्यकर्ते धडकले चड्डा कंपनीवर

**माजरी । प्रतिनिधी**

वेकोलि माजरी क्षेत्रांतर्गत चड्डा कंपनीला माती काढण्याचे साडेतीन वर्षाचे कंत्राट मिळाले. या कामात सदर कंपनीला मोठ्या संख्येत मनुष्यबळ लागणार आहे. परंतु चड्डा कंपनी आपल्या सोबत बाहेरचे कामगारांना आणून मागील दोन महिन्यापासून काम सुरु केले आहे. सद्या कंपनीचे काम जोरात सुरु आहे. यापूर्वी सुद्धा चड्डा कंपनी माजरी क्षेत्रात काम केले होते. त्यावेळी सुद्धा स्थानिकांना डावलून बाहेरील कामगारांना कामावर घेवून काम केले होते. त्यावेळी चड्डा कंपनीला राजकीय आशीर्वाद प्राप्त असल्यामुळे ते यशस्वीही झाले. मात्र त्यावेळी स्थानिकांना डावलून काम केल्यामुळे चड्डा कंपनी विरुद्ध स्थानिकांच्या मनात रोष निर्माण झाले होते. आता ही कंपनी त्याच पद्धतीने काम करण्याच्या तयारीत आहे.

कंपनी प्रशासनाचा स्थानिकांच्या प्रती विरोधी भूमिका लक्षात घेत स्थानिक बेरोजगार युवकांवर अन्याय होवू नये यासाठी संवैधानिक मार्गाने शिवसेना (उबाठा ) गटाचे शहरप्रमुख रविशंकर राय यांनी विधानसभा प्रमुख रविंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनात चड्डा कंपनी सह प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देवून चड्डा कंपनीत स्थानिकांना रोजगार उपलब्ध करून देण्याची मागणी केली. दरम्यान या खाजगी कंपनीला वारंवार निवेदने देवूनसुद्धा स्थानिकांना डावलून कंपनीने काम सुरु केले. सद्या कंपनीचे काम जोराने सुरु आहे. दरम्यान स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करून देण्याकरिता लक्ष वेधून घेण्यासाठी शिवसेना (उबाठा ) कार्यकर्त्यांनी चड्डा कंपनीवर रविवारी धडक दिली. दरम्यान कंपनी व्यवस्थापनाने शिवसैनिकांना चर्चेसाठी ऑफिसमध्ये बोलाविले. दरम्यान चर्चेसाठी शिवसेना शहरप्रमुख रविशंकर राय यांच्या नेतृत्वात पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक चड्डा कंपनीचे व्यवस्थापक चित्तरंजन सिंग यांच्या उपस्तितीत पार पडली. या बैठकीत कंपनीचे व्यवस्थापक चित्तरंजन सिंग यांनी स्थानिकांना रोजगार देण्यासंदर्भात वरिष्ठांशी बोलण्यासाठी दोन दिवसाचा वेळ द्या अशी मागणी केली. यावर उपस्थित शिवसेना पदाधिकाऱ्यांनी कंपनी व्यवस्थापकाची मागणी मान्य करून यावर तोडगा काढण्यासाठी व सकारात्मक चर्चा करण्यासाठी दोन दिवसाचा वेळ दिला. दरम्यान चड्डा कंपनीत रोजगार संदर्भात शिवसेनेकडून अनेक प्रयत्न सुरु असून माजरी परिसरातील बेरोजगार युवकांची अवस्था प्रशासनिक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आला. हाताला काम आणि नौकरी नसल्याने युवकवर्ग वैफल्यग्रस्त झाल्याचे दिसून येत आहे. मात्र बेरोजगाराना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाकडून कोणतीही पावले उचलण्यात आले नाही हे चिंतनीय बाब आहे. यापुढे शिवसेनेकडून संवैधानिक मार्गाने आंदोलन करण्यात येणार आहे. जर संवैधानिक मार्गाने न्याय मिळत नसेल तर शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी रविशंकर राय यांनी दिला.यावेळी उपतालुका प्रमुख रवि भोगे, विभागप्रमुख बंडू मांढरे, उपशहर प्रमुख चंद्रहास राम, शाखाप्रमुख विवेक सूर्यवंशी, मो. अंसार खान, सुनील राजपूत, राजू प्रजापती, राकेश तोटा, प्रमोद ढगे, शुभम सोयाम,सदानंद दासारपू, राजा खान, रवि निषाद, सतीश खडसकर, अंकित मांढरे, नितीन जाधव आदि उपस्थित होते.



# चिंधी माल येथे न्यू अंडर आर्म क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ




**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील चिंधी माल येथील न्यू बाल गणेश मंडळातर्फे आयोजित दि.४ फेब्रुवारी रोज रविवारी न्यू अंडर आर्म क्रिकेट स्पर्धेचे उदघाट्न मोठया थाटात करण्यात आले.या क्रिकेट स्पर्धेचे उदघाट्न चिंधी चक गट ग्रामपंचायतचे सरपंच हरिभाऊ वरठे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून

उपसरपंच प्रदीप समर्थ,नागभीड तालुका मनसेचे उपाध्यक्ष विलास सुतार,होमराज सलामे, हरीश भाकरे, आशिष भाकरे, व्यंकटेश सुतार,नाट्य पॅड वादक रमेश शिंदे,जय बँड ग्रुपचे जागेश आत्राम आदींची उपस्थिती होती. या क्रिकेट स्पर्धेत विजेत्यांना ११हजार १११ रुपयांचे प्रथम बक्षीस मिळणार असून द्वितीय पारितोषिक ६ हजार ६६६ रुपयांचे मिळणार आहे.याशिवाय अन्य मोठे बक्षीस सुद्धा या क्रिकेट स्पर्धेतून स्पर्धकांना मिळविता येणार आहे.दरम्यान या क्रिकेट स्पर्धेचा जास्तीत जास्त स्पर्धकांनी लाभ घ्यावा. असे आवाहन न्यू बाल गणेश मंडळाने केले आहे.

# इंडियन मिलिटरी स्कूलच्या विद्यार्थ्यांची चित्त थरारक प्रात्यक्षिके पाहून आयुक्त झाले मंत्रमुग्ध



**पुलगाव–** स्थानिय इंडियन मिलिटरी स्कूल येथील वार्षिक उत्सवामध्ये उद्घाटक म्हणून रवींद्र ठाकरे अप्पर आयुक्त आदिवासी विभाग नागपूर हे होते. यावेळी त्यांच्यासमोर विद्यार्थ्यांनी सादर केलेली पोटावरून बाईक चालविणे,आगीतून उडी मारून पुढे जाणे,बॅटल ड्रिल पथ संचलन, विविध प्रात्यक्षिके पाहून मंत्रमुग्ध झाले. शाळेला भेट देण्यासाठी आलेले आयुक्त विद्यार्थ्यांच्य प्रात्यक्षिके पाहून विद्यार्थ्यासोबत रमले.यावेळी बोलताना ते म्हणाले शिक्षकांनी भविष्यवेधी शिक्षण पद्धतीचा अवलंब करावा तसेच आपले शैक्षणिक कर्तव्य बजावताना विद्यार्थ्यांच्या विकासासाठी स्वतःला झोकून द्यावे. जेणेकरून भविष्यात एक चांगली पिढी तयार होण्यास मोठी मदत होईल. यावेळी संस्थेचे अध्यक्ष मनोज भेंडे सचिव कृष्णा कडू, कमांडंट कर्नल के एच पाटील, प्राचार्य रविकिरण भोजने,प्रकल्प अधिकारी दीपक हेडाऊ, अमरावतीचे प्रसिद्ध उद्योजक राजेंद्र जाधव, सुमिरन कडू, पर्यवेक्षक नितीन कोठे उपस्थित होते.कार्यक्रमाचे संचालन डेव्हिड रत्नम यांनी केले तर आभार प्रदर्शन अशीच सावे यांनी केले.

# शूरवी महिला महाविद्यालय मूल येथील विद्यार्थिनीचे सुयश



**मूल । प्रतिनिधी**

विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय बेंबाळ येथे राज्यस्तरीय आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेचे आयोजन करून सध्या संपूर्ण देशात वादाचा विषय ठरलेल्या इव्हीइम ला अनुसरून भारतीय निवडणूक प्रक्रियेत इव्हीइम प्रदर्शक भूमिका बजावते. होय किंवा नाही या विषयावर वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सिद्धी माधव अलोनी आणी गौरी संजय शेरकी या बीएससी च्या विद्यार्थिनींनी स्पर्धेत भाग घेत शूरवी महिला महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले. दोन्ही विद्यार्थिनींनी वादविवाद स्पर्धेत प्रभावीपणे आपली बाजू मांडली. यामध्ये सिध्दी आलोनी प्रथम वर्ष हिने होय च्या बाजूने बोलतांना द्वितीय क्रमांक पटकावला.तिला प्रमाणपत्र नगदी रक्कम व ट्रॉफी देऊन मान्यवराचे हस्ते पुरस्कार देण्यात आला.तिच्या यशाबद्दल श्री माता कन्यका सेवा संस्थेचे अध्यक्ष कापर्तीवार व सचिव सुरावार ,महाविद्यालयच्या प्राचार्या हर्षा खरासे आणी महाविद्यालयच्या सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व महाविद्यालयच्या विद्यार्थिनींनी सिद्धीच्या यशाबद्दल तिला शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

# साहील झरकर मूलचे नवे उपविभागीय पोलीस अधिकारी

**मूल । प्रतिनिधी**




येथील उपविभागीय पोलीस अधिकारी पदावर साहील उमाकांत झरकर यांची नियुक्ती करण्यांत आली आहे. पदोन्नतीने नियुक्त झालेले उपविभागीय पोलीस अधिकारी मल्लीकार्जून इंगळे येत्या काही महिण्यांत सेवानिवृत्त होणार असून त्यांची राज्य आर्थिक गुन्हे शाखेत स्थानांतरण करण्यात आले आहे.नक्षलप्रभावीत गडचिरोली जिल्हयातील कुरखेडा पोलीस उपविभागात साहिल झरकर दोन वर्षापासुन सेवारत आहेत.राज्य पोलीस सेवेत असलेले उपविभागीय पोलीस अधिकारी साहील झरकर शिस्तप्रिय अधिकारी म्हणून परिचीत असून नक्षलप्रभावीत कुरखेडा उपविभागात त्यांची सेवा उल्लेखनिय राहीली आहे. त्यामूळे सध्यास्थितीत मूल उपविभागातंर्गत सुरू असलेल्या विविध गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा घालण्यासाठी नवनियुक्त उपविभागीय पोलीस अधिकारी साहीत झरकर यांना कठीण जाईल. असे सध्यातरी वाटत नाही.लवकरच साहील झरकर येथील पदभार सांभाळणार असल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहे.

# गिमाटेक्स वणी युनिटच्या व्यवस्थापनाकडून मृत कामगाराच्या परीवाराला मदतीचा हात

**हिंगणघाट । प्रतिनिधी**

गिमाटेक्स वणी युनिट येथिल कामगार प्रमोद विठ्ठल फुलझेले यांचा कॉम्प्रेसर रूममध्ये ड्रील करतेवेळी केबलवर स्पार्क झाल्यामुळे नुकतेच दि.२९ जानेवारी रोजी गंभीररीत्या जळाले. या दुर्दैवी घटनेत दि.४ फेब्रुवारी २०२४ रोजी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

मृतक फुलझेले यांना दुर्दैवी अपघात घडताच शहरातील उपजिल्हा रुग्णालयात उपचारा करीता दाखल करण्यात आले परंतु डॉक्टरांच्या सल्ल्याने त्वरीत सेवाग्राम येथील रूग्णालयात भरती करण्यात आले.सदर कामगारावर दि. २९ जानेवारी ते दि. ४ फेब्रुवारी रविवारी पहाटे पर्यंत उपचार सुरू असतांना दुर्दैवाने त्यांचा मृत्यू झाला. प्रमोद फुलझेले हे कर्मचारी सिव्हिल इंजिनिअरच्या देखरेखीमध्ये काम करायचे.त्यांना कर्मचारी विमा दवाखाना सुविधा लागू असुन ते कामगार राज्य विमा योजना अंतर्गत लाभार्थी आहेत.या माध्यमातून त्यांना नियमानुसार सर्व लाभ मिळेल.सदर घटनेची




वार्ता मिळताच आमदार श्री समिरभाऊ कुणावार यांनी फॅक्टरी मॅनेजर शाकीर पठाण यांचेशी तात्काळ दुरध्वनीद्वारे संपर्क साधून संघटनेच्या पदाधिकाऱ्यां सोबत बैठक घेऊन निर्णय घेण्याचे निर्देश दिले. संघटनेचे जनरल सेक्रेटरी श्री पांडुरंग बालपांडे व इतर पदाधिकारी तसेच मृतकाचे नातेवाईक यांची बैठक गिमाटेक्स वणी युनिट येथिल फॅक्टरी मॅनेजर पठाण साहेब यांच्या दालनात सुरू झाली.मुतकाचे नातेवाईकांकडून ५० लाख रुपयांची मदत व मृतकाचे मुलाला स्थाई नौकरी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.मिल व्यवस्थापनाकडून स्थाई नौकरीची मागणी मान्य करण्यात आली असून सहानुभूती पुर्वक आर्थिक मदत म्हणून रू ९ लाख रुपयांचा धनादेश मृत कामगाराची पत्नी वैशाली प्रमोद फुलझेले यांना देण्याचे मान्य करण्यात आले. या करारानुसार धनादेश देतेवेळी उपस्थित गिमाटेक्स वणी युनिटचे फॅक्टरी मॅनेजर शाखीर खान पठाण,इलेक्ट्रॉनिक मॅनेजर जितेंद्र शर्मा,पराग जुमडे तसेच वर्धा जिल्हा सुती मिल मजदूर संघटनेचे जनरल सेक्रेटरी पांडुरंग बालपांडे, दामोदर देशमुख, दिवाकर बरबटकर, राकेश तराळे, जयंत बावणे,जिवन भानसे, विनोद कावळे, श्रावण थुटे, हेमंत भगत, प्रशांत शेळके, विजय थुल, राहुल देशमुख,लक्ष्मन जयपूरकर, विनोद कोल्हे, मनोहर जुमडे मृतकाच्या परीवाराकडून सिध्दार्थ प्रमोद फुलझेले, श्रुतिका प्रमोद फुलझेले, अमित नाईक, डॉ उमेश वावरे, पंकज चरबे, निखील हस्ते,सचिन हस्ते ईत्यादी मंडळी उपस्थित होती.

# मुल तालुक्यातील केळझर येथील असंख्य युवकांचा (उबाठा)शिवसेनेत पक्षप्रवेश



**मूल । प्रतिनिधी**

शिवसेना पक्ष प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत शिवसेना चंद्रपूर जिल्हा प्रमुख संदीप गिऱ्हे यांच्या मार्गदर्शनात शिवसेना तालुकाप्रमुख प्रशांत गट्टूवार यांचे नेतृत्वात असंख्य कार्यकर्त्यांच शिवसेनेत प्रवेश झाला.या वेळी शिवसेना शहर प्रमुख आकाश रामयांची प्रमुख उपस्थिती होती सोबतच संदीप रायपूरे माजी युवा सेना तालुका प्रमुख यांची देखील उपस्थिती होते. शिवसेनेचे धोरण ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण हे धोरण पटवून देण्यात आलं.यावेळी युवकांना मार्गदर्शन करताना शिवसेना जिल्हा प्रमुख संदीप गीऱ्हे यांचा जिल्ह्यात कार्यप्रणाली वर प्रकाश टाकीत शिवसेना तालुका प्रमुख प्रशांत गट्टूवार यांनी आज पर्यंत संदीप गीऱ्हे यांनी केलेले कार्य युवकांना पटवून सांगितले.आदी नवयुवकांनी उत्स्फूर्तपणे शिवसेनेत प्रवेश केला.यावेळी मोठ्या संख्येने केळझर येथील युवक उपस्थित होते.

# इंडियन मिलिटरी स्कूल मध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**पुलगाव । प्रतिनिधी**

स्थानिय इंडियन मिलिटरी स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पाडले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून कर्नल के एच पाटील तर प्रमुख पाहुणे रविद्र ठाकरे आयएएस ऍडिशनल ट्रायबल कमिशनर नागपूर, कृष्णा कडू सचिव इंडियन मिलिटरी स्कूल तसेच राजेंद्र जाधव उद्योजक अमरावती, मनोज भेंडे अध्यक्ष इंडियन मिलिटरी स्कूल तसेच श्री रविकिरण भोजने मुख्याध्यापक इंडियन मिलिटरी स्कूल पुलगाव, मान्यवर उपस्थित होते.



सर्वप्रथम रवींद्र एच ठाकरे यांच्याकडून परेड चे निरीक्षण करण्यात आले, तसेच रवींद ठाकरे यांना मानवंदना देण्यात आली.त्यानंतर लगेच मिलिटरी स्कूलच्या विद्यार्थ्यांकडून सैनिकी शिक्षण निदेशक सुनील मोहोड तसेच महेश अलसपुरकर(सुभेदार निवृत्त) यांच्या मार्गदर्शनात मिलिटरी ऍक्टि यांच्या मार्गदर्शनात चित्त थरारक कराटे चे प्रदर्शन घेण्यात आले इत्यादी साहसी आणि शौर्य खेळ तसेच जिम्नास्टिक द्वारा उपस्थित त्यांना मंत्रमुग्ध करण्यात आले. या कार्यक्रमाचे संचालन शाळेचे शिक्षक श्री डेव्हिड रत्नाम यांनी केले .त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली सांस्कृतिक कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्नल के एच पाटील कमांडंट इंडीयन मिलिटरी स्कूल पुलगाव मनोज भेंडे अध्यक्ष इंडियन मिलिटरी स्कूल पुलगाव तसेच प्रमुख पाहुणे रवींद्र एच ठाकरे आयएएस एडिशनल ट्रायबल कमिशनर नागपूर, श्रीकृष्ण कडू सचिव इंडियन मिलिटरी स्कूल राजेंद्र जाधव उद्योजक अमरावती , रविकिरण भोजने मुख्याध्यापक इंडियन मिलिटरी स्कूल पुलगाव उपस्थित होते. सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदनेने झाली. मान्यवरांचे स्वागत झाल्यानंतर अकरावी वर्गाच्या विद्यार्थ्याकडून शिवाजी महाराजांचा पोवाडा सादर करण्यात आला, तसेच वर्ग सहाच्या विद्यार्थ्यांकडून आदिवासी नृत्य सादर करण्यात आले, मागील वर्षी उच्च टक्केवारी घेऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव मण्यावरांच्या हस्ते करण्यात आला. वार्षिक अहवाल शाळेच्या शिक्षिका सौ ऋतुजा घारपळकर यांनी सादर केला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रवींद्र एच ठाकरे आयएएस डिशनल ट्रायबल कमिशनर यांनी सैनिकी शाळा आणि सैनिकी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्यांनी सांगितले की ते स्वतःही सैनिकी शाळेचे विद्यार्थी असून देशात सैनिकी अधिकारी तयार होणारी ही एक नावाजलेली संस्था असल्यामुळे या शाळेचा जास्तीत जास्त उपयोग करून भारतीय सैन्यामध्ये अधिकारी घडले पाहिजेत,असे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले, तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी राजेंद्र जाधव यांनी विद्यार्थ्यांना आणि उपस्थितांना उद्योजक व्हा, कृतिशील व्हा आणि गतिशील व्हा! या शब्दात मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर सर्वांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला.सर्व पालकांनी अत्यंत आनंदाने भोजनाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाचे संचालन प्रवीण शेळके व अर्चना जगताप यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन आशिष साळवे यांनी केले.

# नमो चषक ;संगीत खुर्ची ,रस्सीखेच स्पर्धेला महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

**आष्टी । प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेने युवक व युवतींच्या मनामध्ये खेळाडू वर्ती जोपासण्यासाठी देशभरात नमो चषक २०२४ अंर्तगत मोठ्या प्रमाणात स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. माजी राज्यमंत्री व विधानपरिषदेचे कार्यसम्राट आमदार सुरेश धस व शेरी बु सरपंच युवानेते संदीप खाकाळ यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शिवनेरी ग्रुप मित्रमंडळ आष्टी व ग्रामस्थांच्या वतीने संगीत खुर्ची व रस्सी खेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

भाजपचे कार्यसम्राट आमदार सुरेश धस व शिवनेरी ग्रुपचे अध्यक्ष तथा युवानेते संदीप खाकाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यातील शेरी बु येथे छत्रपती संभाजी महाराज चौकात ग्रामस्थांच्या वतीने नमो चषक २०२४ अंतर्गत पार पडलेल्या संगीत खुर्ची आणि रस्सीखेच स्पर्धेत महिलांचा सळसळत्या उत्साहासह उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. या स्पर्धेत जवळपास ४०० महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन अतिशय आनंदमय वातावरण ही स्पर्धा पार पडली असून संगीतखुर्ची व रस्सीखेच स्पर्धेत विजेत्या महिलांना साडी चोळी देऊन गौरविण्यात आले आहे.या स्पर्धेला महिला व युवतींचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. रस्सीखेच व संगीत खुर्ची ही स्पर्धा अतिशय उत्साहात पार पडली, यावेळी महिलांचा मोठा सहभाग व उत्साह पहावयास मिळाला.

ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शिवक्रांती चे प्रदेशाध्यक्ष दिपक सोनवणे, शक्ती केंद्राचे मार्गदर्शक राहुल गोरे, शिवाजी डोरले, दयानंद भालेकर, अभिजित वाघुले, परशुराम शिरोळे, लालाशेठ शेख, बाळासाहेब खाकाळ, सुनिल अस्टेकर, कबीर सय्यद, रवींद्र महाडिक, नवनाथ धर्माधिकारी परिश्रम घेतले व या स्पर्धेत माधुरी ताई खाकाळ, उज्वला सोनवणे, वैशाली गोरे, स्वाती गोरे,सविता सोनवणे, आशा सोनवणे, सिमा महाडिक, नंदा महाडिक, ज्योती महाडिक, सुवर्णा महाडिक, निता महाडिक,आशा महाडिक आदी असंख्य महिला उपस्थित होत्या.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .